||श्री राम समर्थ||
||श्री नागनाथ प्रसन्न||
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेज थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २२५ वा | मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# मोहोळ तालुक्यात बेकायदेशीर वाळू माफियांचा सुळसुळाट

## प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात उपोषणाचा इशारा

- सिद्धेश्वर इंटरप्राईजेस पंढरपूर यांना मिळणारा ठेका रद्द करण्याची मागणी
- भोगावती-सीना-भीमा नदीत बेकायदेशीर वाळू उपसा; नदीपात्रांची लूट सुरूच
- शेतकऱ्यांना धमक्या, प्रशासन गप्प
- अवैध वाळू उपशामुळे पर्यावरण धोक्यात



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील भोगावती, सीना आणि भीमा नदी पात्रामध्ये दिवस-रात्र सुरू असलेल्या बेकायदेशीर वाळू उपसा व वाहतुकीमुळे पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचा आरोप फळकार्यकर्ते लक्ष्मण भुजंग मगर यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी तहसीलदारांना निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी केली असून, सिद्धेश्वर इंटरप्राईजेस यांनी मिरी या ठिकाणी 13000 ब्रास ची परमिशन असताना त्या काळात वाळू माफियांनी मिरी येथील भीमा नदी पात्रामध्ये 25000 ब्रास इतका वैद्य साठा केलेला असून त्यांना पुढील मिळणारे शासकीय ठेका हा रद्द करण्यात यावे आणि सदरील स्थळाची पाहणी करून गट नंबर 51 ते 58 गाळयुक्त असलेली वाळू साठा करण्यासाठी परमिशन असताना तेथील वाळू माफिया सिद्धेश्वर एंटरप्राइजेस पंढरपूर यांनी डायरेक्ट कोणती शासकीय परमिशन नसताना उपसा केलेला आहे तहसीलदार सचिन मुळीक व पोलिस प्रशासन कामती यांनी बेकायदेशीर वाळू उपसा करणांया वाळू माफिया वर कलम 1966, नुसार 48 (7) व (8) नुसार एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी दोन खनिज घेऊन जाणे व उत्खनन करणे या याद्वारे दंडात्मक कारवाई व पोलीस स्टेशनची ऋक्षफ नोंदवून पुन्हा दाखल करावा तसेच आरएटीएस मोजमापका द्वारे किती बेकायदेशीर उपसा केला आहे याची मोजणी केल्यानंतरच ठेका देण्यात यावा त्यांनी केलेल्या अधिक वाळू उपसामुळे भीमा नदीपत्राचे पात्र हे पूर्णतः बदलून गेले असून करोडो रुपयाचे त्यांनी महसूल बुडवून उत्खनन केलेले आहे सदरी व्यक्तीवर कारवाई करा सिद्धेश्वर इंटरप्रायजेस ला मिळणारा पुढील शासकीय ठेका रद्द करा अन्यथा मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठ कोल्हापूर येथे जनहित याचिका दाखल करणार सदरची माहिती पुणे आयुक्त यांना देण्यात आलेले असून लवकरच कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशाराही दिला आहे.

मगर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित नदीपात्रांमध्ये कोणत्याही प्रकारचा शासकीय वाळू उपसा ठेका नसतानाही मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन सुरू आहे. स्थानिक वाळू माफिया कोणाच्या आशीवार्दाने हा उपसा करीत आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या बेकायदेशीर प्रकारामुळे शासनाचा महसूल बुडत असून



पर्यावरणाचीही मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे.

तसेच, वाळू उपशाला विरोध करणाऱ्या स्थानिक शेतकऱ्यांना धमकावले जात असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. महसूल विभाग केवळ 'बघ्याची भूमिका' घेत असल्याने माफियांचे धाडस वाढले असल्याचे मगर यांनी नमूद केले आहे.



दरम्यान, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पथकाने खुनेश्वर व रानमसले परिसरात कारवाई केली होती. मात्र, ती केवळ कागदोपत्रीच राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे. मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असला तरी महसूल विभागाकडून अद्याप ठोस कारवाई झालेली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

या बेकायदेशीर उपशामुळे सीना व भोगावती नदीपात्रांची स्थिती बिकट झाली असून गेल्या वर्षी पूरस्थिती निर्माण होण्यासही याचा परिणाम झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या पुरामुळे हजारो हेक्टर शेतीचे नुकसान झाले, मात्र शेतकऱ्यांना अपेक्षित अनुदान मिळाले नाही, असेही त्यांनी नमूद केले.

मोहोळ तालुक्यातील सर्व भागात भोयरे, आष्टे, वाळूज, कोळेगाव आणि मिरी या भागात यंत्रांच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. यामुळे नदीपात्र खोल होत असून भविष्यात मोठे पर्यावरणीय संकट निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, 'गेली दोन वर्षे प्रशासनाला वारंवार कळवूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने आता आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही,' असे सांगत मगर यांनी दोन दिवसांत कारवाई न झाल्यास महसूल व पोलिस प्रशासनाविरोधात अन्नत्याग उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अन्यथा परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## सोलापूर बंद करू, रक्त सांडू; पण रिक्षा चालकांना न्याय मिळवून देऊ- आडम मास्तर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** 'रिक्षा चालकांच्या प्रश्नांकडे प्रशासनाने दुर्लक्षच केले तर प्रसंगी सोलापूर बंद करू, रक्त सांडू; पण रिक्षा चालकांना न्याय मिळवून देऊ,' असा तीव्र इशारा ज्येष्ठ कामगार नेते, माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी दिला. सोलापूर रिक्षा संघटना कृती समितीच्या वतीने दि. १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता भव्य महामोचार्चे आयोजन करण्यात आले असून, त्याची माहिती आज दत्तनगर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

हा महामोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते पुनम गेट या मार्गावर काढण्यात येणार असून, मोचार्चे नेतृत्व कॉ. आडम मास्तर करणार आहेत.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, सोलापूर शहर व जिल्ह्यातील हजारो रिक्षा चालकांचा उदरनिर्वाह पूर्णपणे एलपीजी गॅसवर अवलंबून आहे. मात्र अनेक एलपीजी पंप बंद असल्याने चालकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे. उपलब्ध पंपांवरही अपुरा गॅस पुरवठा होत असल्याने रिक्षा व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. याशिवाय एलपीजीच्या वाढत्या दरामुळे चालकांचे आर्थिक गणित कोलमडले असून त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न गंभीर बनला आहे.

### आश्वासनाचा भंग झ्र चालकांमध्ये संताप

कृती समितीच्या शिष्टमंडळाने दि. ६ एप्रिल २०२६ रोजी सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहात पालकमंत्री मा. ना. जयकुमार गोरे यांची भेट घेऊन सुमारे १६ हजार

### १६ एप्रिल रोजी भव्य महामोर्चा




रिक्षा चालकांच्या रोजीरोटीच्या प्रश्नासंदर्भात निवेदन दिले होते. त्यावेळी संबंधित अधिकारी, रिक्षा चालक संघटना प्रतिनिधी व पंप चालक यांची संयुक्त बैठक १० एप्रिलपर्यंत घेण्याचे ठोस आश्वासन देण्यात आले होते. मात्र अद्यापही ही बैठक घेण्यात आलेली नसल्याने रिक्षा चालकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

यासंदर्भात कॉ. आडम मास्तर यांनी पालकमंत्र्यांना पुन्हा पत्र देत तात्काळ संयुक्त बैठक घेण्याची मागणी केली असून, शहरातील सध्या ७ एलपीजी गॅस पंप बंद असल्यामुळे रिक्षा चालकांचा रोजगार मोठ्या प्रमाणात बुडत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

**मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे :**

- सोलापूरातील सर्व एलपीजी पंप तात्काळ सुरू करावेत
- एलपीजी गॅस दरात तात्काळ कपात करावी
- रिक्षा चालकांसाठी नियमित व पुरेसा गॅस पुरवठा सुनिश्चित करावा

रिक्षा चालकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

या महामोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) रिक्षा सेल, वाहतूक संघटना संयुक्त महासंघ, लालबावटा रिक्षा संघटना, सोलापूर रिक्षा युनियन, सोलापूर शहर व जिल्हा ऑटो रिक्षा संघटना (एस. टी. स्टॅण्ड), बसवसेना रिक्षाचालक बहुउद्देशीय संस्था, राष्ट्रवादी काँग्रेस रिक्षा सेना (शरद पवार गट), रिपब्लिकन सेना रिक्षाचालक मालक संघटना, रेल्वे स्टेशन रिक्षा संघटना आदी संघटनांचा सक्रिय पाठिंबा असल्याची माहिती देण्यात आली.

कृती समितीच्या वतीने सर्व रिक्षा चालकांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस ॲड. अनिल वासम, चाँदसाब मुजावर (कमी), शाबूद्दीन शेख, रफिक काझी, प्रदीप शिंगे, राजू शिदगणे, अमोल दुरके, रियाज सय्यद, कॉ. एम. एच. शेख (उक्कळव), युसुफ शेख (मेजर), महिपती पवार, अतिश शिंदे, अकील शेख, आसिफ पठाण आदी उपस्थित होते.

## उजनी धरणातून भीमा नदीत 15 एप्रिल पासून पाणी सोडणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणातून खाली भीमा नदीत 15 एप्रिल पासून पाणी सोडण्यात येणार आहे. हे पाणी खाली हिळ्ळी व खानापूर टेल एण्डपर्यंत सोडण्याची मागणी आता या भागातील शेतकरी करताना दिसून येत आहेत.

अक्कलकोट तालुक्यात सध्या दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. तसेच शेतीसाठी बंधाऱ्यातील पाण्याची उपसा अधिक होत असल्याने सध्या हिळ्ळी व खानापूर बंधाऱ्यातील पाण्याची पातळी घटली गेली आहे.

आता दहा ते बारा दिवसच पुरेल इतका पाणीसाठा बंधाऱ्यात शिल्लक राहिल्याने हिळ्ळी व खानापूर परिसरातील शेतकरी चिंतातूर झाले आहेत. सध्या उन्हाची तीव्रता वाढल्याने बाष्पीभवन होऊन दिवसेंदिवस बंधाऱ्यातील पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. हिळ्ळी बंधाऱ्याच्या खाली महाराष्ट्र सरकारची तीन किलोमीटर पर्यंत हद्द आहे. सध्या या भागात पाणीच शिल्लक नसल्याने जनावरांचे व वाडी वस्तीवरील जनतेचे हाल होत आहेत.




## महेश सदाफुले यांच्या 'शुभकामना' पेन्सिल आर्ट चित्रांचे बुधवारपासून प्रदर्शन





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कर्नाटकातील कलबुर्गी (गुलबर्गा) येथे वास्तव्यास असलेले चित्रकार महेश सदाफुले यांच्या 'शुभकामना' या पेन्सिल आर्ट चित्रांच्या प्रदर्शनाचे आयोजन येथील डफरीन चौकातील पु. ना. गाडगीळ अँड सन्सच्या झपुर्झा आर्ट गॅलरीत बुधवार दि. १५ ते १९ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले असून, यामध्ये ४५ कलाकृतींचा समावेश आहे, अशी माहिती संतोष धाटेगाव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या प्रदर्शनाचे उद्घाटन बुधवार दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता होणार असून, माजी प्राचार्य सुदर्शन देवरकोंडा यांच्या हस्ते उद्घाटन होईल. यावेळी

हास्यसम्राट प्रा. दीपक देशपांडे, राज्य शैक्षणिक कला शिक्षक संघाचे अध्यक्ष शेरशाह डोंगरी तसेच जिल्हाध्यक्ष शशिकांत सदाफुले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी प्राचार्य गोपाळराव डोंगे आणि प्रा. धनंजय टाकळीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या गॅलरीतील हे पाचवे चित्रप्रदर्शन असून 'शुभकामना' असे या प्रदर्शनाचे शीर्षक आहे. गुरुवार दि. 16 एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता चित्रकार नितीन खिलारे यांचे प्रात्यक्षिक होणार आहे. प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी सोलापूर जिल्हा शैक्षणिक कला शिक्षक संघाचे विशेष सहकार्य लाभत आहे.

या प्रदर्शनास कला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकृती पाहायला यावे, असे आवाहन चित्रकार महेश सदाफुले व पु. ना. गाडगीळ अँड सन्सचे जितेंद्र जोशी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस शेरशाह डोंगरी, शांतप्पा काळे आदी उपस्थित होते.


सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949



आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450



शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम 8275274353
डी.बी.शिंदे 9579421465



VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


### वात्रटिका

**लोकशाही हसली**

आम्ही जेव्हा बघितले तेव्हा
त्यांच्यात दिसली धूसफूस...
आज वेगळेच पाहिले आम्ही
त्यांनी केली विचारपूस...
चौकीदार आणि राजकुमार
गप्पा मारण्यात म्हणे रंगले...
लोकशाही मजबूत होतेय
अशा चर्चेत लोक दंगले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# महात्मा फुले हे कर्ते सुधारक : प्रशांत सरुडकर



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** संघर्ष करायचा असेल तर या देशातील लोकांना सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे. तरच लोकांमध्ये परिवर्तन होईल. महात्मा फुले हे कर्ते सुधारक होते. १८५१ मध्ये पहिली शाळा महात्मा फुले यांनी पुण्यामध्ये सुरू केली. या देशातील शेतकरी हा सक्षम झाला पाहिजे यासाठी महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुलेंच्या साहित्याने या देशात क्रांतिकारक बदल झाले. प्रत्येक क्षेत्रामध्ये महात्मा फुले यांनी आपला ठसा उमटवलेला आसल्याचे मत व्याख्याते प्रशांत सरुडकर यांनी व्यक्त केले.

ते नातेपुते येथे महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या व्याख्यान दरम्यान बोलत होते.

या कार्यक्रमास ज्येष्ठ नगरसेवक बी वाय राऊत, मुख्याधिकारी विकास शिंगाडे, रिपाई नेते एन के साळवे, ज्येष्ठ नेते अर्जुन जठार, चेअरमन अंबादास बरडकर, सुनील साळवे, उत्तम बरडकर, राजकुमार हिवरकर, अशोक राऊत, नवाज सोरटे, सदाशिव काळे, प्रवीण काळे, संघर्ष सोरटे उपस्थित होते. यावेळी रणजीत जठार, मुख्याधिकारी विकास शिंगाडे, एन के साळवे, सुनील साळवे, राजकुमार हिवरकर, अभिजीत वाळके यांनी आपले मनोगते व्यक्त केली. उपस्थित सर्व मान्यवरांनी तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीने महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार उत्तम बरडकर यांनी मानले. कार्यक्रमास मान्यवर व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माढा शहरात अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय झाले मंजूर

## आ. अभिजीत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**माढा (कटूसत्य वृत्त):-** सतत माढा मतदारसंघाच्या नवनवीन योजना व प्रकल्प मांडण्यामध्ये आमदार अभिजीत पाटील हे नेहमीच कार्यरत असताना दिसत आहेत परंतु माढा शहरात जिल्हा व सत्र न्यायालय मंजूरीसाठी आमदार अभिजीत पाटील हे सतत प्रयत्न करत असल्याने आनंदाची बाब म्हणून माढा तालुक्यासाठी हा एक मोठा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे. माढा परिसरातील नागरिकांना आता बाशींर्ला जाण्याची गरज उरणार नाही, ज्यामुळे वेळ आणि पैशांची बचत देखील होईल.

प्रलंबित खटल्यांचा निपटाराअतिरिक्त जिल्हा न्यायालय झाल्यामुळे स्थानिक पातळीवर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचे आणि



दिवाणी खटल्यांचे कामकाज जलद गतीने चालण्यास मदत होईल. वकिलांसाठी सोय स्थानिक वकिलांना आता माढ्यातच जिल्हा स्तरावरील कामकाज पाहण्याची संधी मिळेल.

**आमदार अभिजीत पाटील यांची प्रतिक्रिया:**
"माढ्यातील जनतेला न्याय मिळवण्यासाठी दूरवर पायपीट करावी लागू नये, हे आमचे ध्येय होते. या न्यायालयाच्या मंजुरीमुळे माढ्याचा प्रशासकीय दर्जा उंचावला आहे. हे न्यायालय लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे यासाठी आवश्यक असलेल्या इमारतीचे आणि पायाभूत सुविधांचे कामही आम्ही प्राधान्याने पूर्ण करून घेऊ." यामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

आमदार अभिजीत पाटील यांनी त्यांच्या निवडणूक प्रचारादरम्यान आणि त्यानंतरही मतदारसंघातील प्रशासकीय सोयीसुविधांसाठी सतत प्रयत्न केले होते. या न्यायालयाच्या मंजुरीमुळे माढा शहराच्या वैभवात भर पडली असून नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. या निर्णयामुळे माढा तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना आणि पक्षकारांना मोठा दिलासा मिळाला असून, आता गंभीर स्वरूपाच्या खटल्यांच्या सुनावणीसाठी सोलापूरला जाण्याची गरज उरणार नाही.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल माढा शहर आणि तालुक्यातील नागरिक, वकील संघ आणि राजकीय कार्यकर्त्यांनी आमदार अभिजीत पाटील यांचे विशेष आभार मानले आहेत.

# सायबर गुन्ह्यातून मुक्त करण्याचे आमिष दाखवून 3 लाखांची लूट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कल्याणमधील कैद्याची सोलापूरच्या कारागृहात ओळख झाली. त्याचे सायबर गुन्ह्यातून नाव काढून टाकण्याचे आणि मोठ्या पुढाऱ्यांशी ओळख असल्याचे आमिष दाखवून त्याला निर्जनस्थळी बोलावून सुमारे तीन लाखांचा ऐवज लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली.

याप्रकरणी लूट झालेला फियार्दी ग्लेन पर्सी सिक्वेरा (वय 48, रा. कल्याण) यांनी मंगळवेढा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी अजित ऊर्फ काळ्या सुरेश पवार आणि त्याच्या दोन अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

सिक्वेरा सायबर फ्रॉडच्या गुन्ह्यात सोलापूर जिल्हा कारागृहात होता. तिथे त्याची ओळख नंदूरच्या अजित पवारशी झाली. अजितने सिक्वेराला माझी मोठ्या लोकांशी ओळख आहे, मी तुला या गुन्ह्यातून बाहेर काढतो, असे सांगत त्याचा विश्वास संपादन केला. पुढे 9 एप्रिल 2026 रोजी, फियार्दी सिक्वेरा हा त्याची सहकारी मनीषा हरावत हिच्यासह सोलापूर येथे आला. अजितने त्यास ब्रह्मपुरी ते मुंढेवाडी रोडवर एका निर्जनस्थळाचे लोकेशन पाठवले. सिक्वेरा आणि हरावत तिथे पोहोचले असता अजितसोबत एक अनोळखी महिला आणि एक तरुण तिथे होता. तिथे अजितच्या महिला साथीदाराने मनीषाला धमकी देत दागिने व पैसे काढून घेतले. यामध्ये रोख रक्कम, दागिन्यांसह सुमारे तीन लाखांचा ऐवज लुटला.

# आंबेडकर जयंतीत 'नो डीजे, नो डॉल्बी'; पारंपरिक वाद्यांनाच प्राधान्य

## पोलीस प्रशासनाचे आवाहन



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्सव शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा व्हावा, यासाठी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या वेळी 'नो डीजे, नो डॉल्बी'धोरण राबवून पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातूनच जयंती साजरी करावी, असे स्पष्ट आवाहन सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी राहुल आत्राम (IPS) यांनी केले.

बैठकीत मार्गदर्शन करताना आत्राम यांनी सांगितले की, जयंती उत्सवात सर्वांनी उत्साहाने सहभागी व्हावे; मात्र कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श ठेवून, प्रेरणादायी वातावरणात पारंपरिक वाद्यांचा वापर करून जयंती साजरी करावी, असेही त्यांनी नमूद केले. कायद्याचे उल्लंघन टाळून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या बैठकीस टेंभुर्णी, मोडनिंब, बेंबळे, अरण व तुळशी या गावांतील आंबेडकरप्रेमी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहिदास पवार, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने, पोलीस उपनिरीक्षक स्वाती सुरवसे तसेच पोलीस अंमलदार व कार्यकर्ते उपस्थित होते.

आंबेडकर जयंती उत्सव शांततेत व पारंपरिक पद्धतीने पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने तयारी केली असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशिक्षण प्रभारी अधिकारी आयपीएस राहुल आत्राम यांनी केले आहे.

# मुलांच्या अंगी असलेले उपजत गुण ओळखा व सुजाणं पालक बना- इंद्रजित देशमुख



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** पालकत्व ही केवळ एका घरापूरती मयार्दीत गोष्ट नसून ती संपूर्ण संस्कृतीचे प्रतिबिंब असतें. मुलांच्या अंगी असलेले चांगले उपजत गुण ओळखा व सुजाणं पालक बना असा मौलिक सल्ला माजी सनदी अधिकारी व संत साहित्याचे अभ्यासक इंद्रजित देशमुख यांनी दिला.

अकलूज येथील शिवरत्न शिक्षण संस्थेच्या वतीने शंकरनगर येथील स्मृती भवन मध्ये "पालकत्व आणि शिक्षकत्व एक सुसंवाद " या विषयावर इंद्रजित देशमुख यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी आपलें विचार मांडले.

देशमुख म्हणाले, 13 व्या वर्षापर्यंत मुलं हे निरागस असतें. या वयात पालकानी त्याच्या जवळ रहावे, त्याच्याकडे दुर्लक्ष करु नये, त्याची इतरांशी तुलना करूं नये, त्याला रागावू नये, मारू नये व सततच्या सुचना करु नये. काही पालक घरात हुकूमशाही पद्धतीने वागतात त्यामुळे मुलांची कुचंबना होते. काही पालक भित्रे असतात तर काही रेसिंग पालक असतात. एकविसावे शतक हे शिक्षण क्षेत्रात अमूलाग्र बदल घेउन आलेले शतक आहे. पालकानी काळाची पाऊले ओळखून रूढी, परंपरा यांना फाटा देऊन सुजाणं पालक बनण्याचा प्रयत्न करावा. मुलांच्या आवडी निवडी ओळखा, मुलांशी संवाद साधा आणि सर्वात महत्वाचे घरात आल्यावर मोबाईल बंद ठेवा असे ते म्हणाले.

प्रारंभी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शीतलदेवी मोहिते पाटील यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेऊन विद्यार्थी व पालक यांच्यात समन्वय रहावा म्हणून दरवर्षी व्याख्यांनाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले. मुलांच्या गुणांत्मक वाढी बरोबर त्यांच्या अंगी असलेल्या कला गुणांना वाव देण्याचे काम संस्था करीत असल्याचे सांगून शिक्षण क्षेत्रातील बदल ओळखून संस्थेने मिलिनिअम स्कुलची स्थापना केल्याचे त्या म्हणाल्या.

या कार्यक्रमास संस्थेचे सचिव धर्माराज दगडे, डॉ विश्वनाथ आवड, अनिल जाधव, नितीन बनकर, रामकृष्ण काटकर प्राचार्य अल्बर्ट थरकन, प्रीन्सीपल बिनो के. पाऊलस, ह भ प सुरेश सूळ, प्रा धनंजय देशमुख यांच्यासह पालक व शिक्षक उपस्थित होते. सुत्रसंचालन व आभार रोहित देशमुख यांनी मानले.

# दि मॉडेल विविधांगी प्रशालेत महात्मा फुले जयंती साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** थोर समाजसेवक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती दि मॉडेल विविधांगी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय माळीनगर येथे उत्साहात साजरी करून अभिवादन करण्यात आले.

प्रशालेत सामाजिक समता सप्ताह २०२६ साजरा करण्यात येत असून जयंतीच्या निमित्ताने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेतील शिक्षिका वैशाली बनकर,आशा रानमाळ व निशा दळवी यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्प अर्पण करून करण्यात आले.

याप्रसंगी प्रशालेचे प्राचार्य कलाप्पा बिराजदार, उपप्राचार्य रितेश पांढरे, शिक्षक महादेव एकतपुरे, विजय महाडिक, राजेश कांबळे यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाची सुरुवात यावेळी करण्यात आली. त्यानिमित्ताने शिक्षक संजय बांदल यांनी महात्मा फुले यांचे कार्य व महात्मा फुले आणि डॉ.आंबेडकर यांचे वैचारिक विचार याविषयी विचार व्यक्त करून त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

" स्त्री जातीच्या मुक्तीसाठी आले महात्मा फुले ग...., आले महात्मा फुले मुलींचे शिक्षण केले खुले ग.... हे गीत राजेश कांबळे यांनी सादर केले.या कार्यक्रमात सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय बांदल यांनी केले.

# सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये जागतिक आरोग्य दिन उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, केगाव येथे जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी ७ एप्रिल रोजी साजरा होणाऱ्या या दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक घोषवाक्ये सादर करून वातावरण उत्साही केले. यावेळी विज्ञान शिक्षिका डॉ. सबा शेख यांनी प्रमुख वक्त्या म्हणून मार्गदर्शन करत निरोगी जीवनशैलीचे महत्त्व स्पष्ट केले. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि मानसिक स्वास्थ्य यांचा अंगीकार केल्यास निरोगी जीवन जगता येते, असे त्यांनी सांगितले. 'आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नाही, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या निरोगी असणे होय,' असेही त्यांनी नमूद केले.

यात्रसंगी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी चांगल्या सवयी आत्मसात करणे आवश्यक असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे त्यांनी सांगितले.

यंदाच्या जागतिक आरोग्य दिनाची संकल्पना 'आरोग्यासाठी एकजूट : विज्ञानाच्या पाठीशी उभे राहूया'अशी असून विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक योग्य माहिती स्वीकारून अफवांपासून दूर राहावे, असेही आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, उपमुख्याध्यापिका निकहत शेख, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी निरोगी जीवन जगण्याचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# लोककल्याणकारी सरकारच्या योजना वांझ ठरताहेत- डॉ. श्रीपाल सबनीस



तिसऱ्या राज्यस्तरीय कर्मवीर भाऊराव पाटील साहित्यसमन्याचे साहित्य संमेलनाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करताना संमेलन अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस ,माधव गादेकर, बी. आर. कलवले, भरतकुमार मोरे, डॉ. ऋत्विक जयकर, विजयकुमार कांबळे, नलिनी चंदिले, व इतर मानवर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात दररोज आत्महत्या होत आहेत. भोंदू बाबांचे पीक जोमात वाढत आहे. शेतकरी हवालदिल झाले आहेत. आत्महत्या करत आहेत. गोरगरिबांचे कल्याण करू असे म्हणणाऱ्या या सरकारच्या प्रत्येक योजना वांज ठरत आहेत असा घनाघाती आरोप संमेलना अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केला.

कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ नांदेड आयोजित तिसरे राज्यस्तरीय कर्मवीर भाऊराव पाटील साहित्य संमेलन संमेलनाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उद्घाटक माधव गादेकर, माजी आ. बब्रुवान खंदाडे, अध्यक्ष बी आर कलवले, स्वागताध्यक्ष लक्ष्मण कारले, सौ ललिता सबनीस, सत्कारमूर्ती कुमार करजगी, डॉ. ऋत्विक जयकर, दिगंबर ढेपे, संयोजक पत्रकार भरतकुमार मोरे ,महापौर नलिनी चंदिले, प्रा. भीमाशंकर बिराजदार, विजयकुमार कांबळे, श्रीकांत बोराडे. यांची उपस्थिती होती. प्रारंभी संयोजक भारतकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले.

पुढे बोलताना सबनीस म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी संत गाडगेबाबा, बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात केले. आणि शिक्षणाची गंगोत्री समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविली. कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक महापुरुषांचे विचार एकवटलेले दिसून येतात. असे गौरव उद्गार त्यांनी यावेळी काढले.

यावेळी उद्योजक डॉ. कुमार करजगी यांना जीवनगौरव पुरस्काराने तर डॉ. ऋत्विक जयकर (वैद्यकीय), ह.भ.प. विठ्ठल माने (धार्मिक), दिगंबर ढेपे (शैक्षणिक) यांचा सन्मानचिन्ह देऊन

विशेष गौरव करण्यात आला

यापासून प्रसंगी दत्तात्रय इंगळे, विजयकुमार सोनवणे, प्रिया चौधरी, किशोर जाधव यांच्या साहित्यकृतीचे प्रकाशन झाले.

दुपारच्या वेळेत 'कर्मवीर भाऊराव पाटील यांची शैक्षणिक दृष्टी व सध्याचे शैक्षणिक धोरण' या विषयावर डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला यात प्रा.डॉ. अनिता शिंदे, प्रा.डॉ. जयदथ जाधव, प्रा.डॉ. जयदेवी पवार, हे सहभागी झाले दुपारी कवी दत्तात्रय इंगळे यांच्या नेतृत्वाखाली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महाकवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.असून या कवी संमेलनात शहर जिल्हा व राज्यातील जवळपास ७० कवी सहभागी झाले होते.

यात्रसंगी नरेंद्र गुंडेली, दस्तगीर जमादार, भगवान चौगुले, राजश्री जाधव, सुरेश निकंबे यांची प्रमुख उपस्थिती होती.सायंकाळी राजेंद्र पाराध्ये (शैक्षणिक), नानासाहेब मोरे, देविदास कसबे (समाजभूषण,) अगंद जाधव (सामाजिक), ॲड. कोमल ढोबळे, ॲड. गोविंद सूर्यवंशी (विधी), नागनाथ गायकवाड, उत्तरेश्वर मठपती, किशोर जाधव (सर्व साहित्यिक), डॉ. सिद्धेश्वर करजखेडे (वैद्यकीय), दत्ता वाघमारे (उद्योग) यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉक्टर अंजना गायकवाड यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बी आर कलवले यांनी केले. या कार्यक्रमास सोलापूर धाराशिव अकलूज लातूर पंढरपूर यासह नांदेड या भागातील साहित्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रभाग ६ मध्ये नगरसेवक गणेश वानकर यांच्या हस्ते रस्ता कॉँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार देवेंद्र दादा कोठे यांच्या विकास निधीतून प्रभाग क्रमांक सहामध्ये डोणगाव रस्त्यावरील सलगर वस्ती जवळील इंद्रप्रस्थ फेज तीन येथे रस्ता कॉँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला.

प्रभाग क्रमांक सहा मधील इंद्रप्रस्थ फेज तीन परिसरात मुख्य रस्ता करण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांकडून होत होती. विशेषतः पावसाळ्यात या परिसरात वाहनधारकांना तसेच पायी जाणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे इंद्रप्रस्थ फेज तीन कडे जाणारा मुख्य रस्ता व्हावा अशी मागणी परिसरातील नागरिकांनी माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांच्याकडे केली होती. लोकप्रिय आमदार देवेंद्र दादा कोठे यांनी या मागणीची दखल घेऊन पावसाळ्यापूर्वी निधी देऊन येथील रस्ता करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार इंद्रप्रस्थ फेज तीन परिसरात रस्ता कॉँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ रविवारी करण्यात आला. याकरिता लोकप्रिय आमदार देवेंद्र दादा कोठे यांनी २८ लाख ७२ हजार रुपयांचा विकास निधी उपलब्ध करून दिला आहे. रस्त्याचे काम सुरू झाल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी आमदार देवेंद्र दादा कोठे आणि नगरसेवक गणेश दादा वानकर यांचे आभार मानले.

यात्रसंगी माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, नूतन नगरसेवक गणेश वानकर, नगरसेविका मृण्मयी गवळी, नगरसेविका सोनाली गायकवाड, नगरसेविका विजया खरात, महादेव गवळी, अर्जुन गायकवाड, पवन खांडेकर आदी उपस्थित होते.

# अनगर येथे महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथील शंक१राव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना च्या वतीने महान समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीनगर सिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख शरद पवार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यावेळी प्रा. रमेश चव्हाण यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या सामाजिक कार्याची व शिक्षणातील योगदानाची महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना फुले यांच्या विचारांचे अनुसरण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमासाठी प्राचार्य महादेव चोपडे, उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके, सत्यवान कांबळे, गोरख गायकवाड, सोमनाथ ढोले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी पांडुरंग शिंदे, दाजी गुंड, उज्वला घोलप, सत्यवान दाढे, अर्चना गुंड, क्षमा काझी, डॉ. प्रशांत कुलकर्णी, बापूराव घुले, झाकीर मुलानी, आदलिंगे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग शिंदे यांनी केले, तर सत्यवान कांबळे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# श्री क्षेत्र मार्डी येथे भाविकांसाठी पाणपोईचा शुभारंभ

**उत्तर सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री क्षेत्र मार्डी येथील यमाई देवीच्या यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांची तहान भागवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते संजय खरटमल यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या पाणपोईचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. सोलापूर येथील पाखर संकुलाच्या संस्थापिका तथा शुभराय महाराजांच्या विद्यमान वंशज शुभांगी बुवा यांच्या हस्ते या पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाला विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री तात्याश्री विष्णू जगताप यांची विशेष उपस्थिती होती. तसेच मार्डी गावचे उपसरपंच श्रीकांतजी मातंर्डे, शिवसेनेचे नेते संजयजी पौळ आणि भाजपचे ज्येष्ठ नेते शिवाजी सोनार यांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले.



यमाई देवीच्या यात्रेसाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात भाविक मार्डी परिसरात येतात. उन्हाचा वाढता तडाखा लक्षात घेता, संजय खरटमल यांनी सामाजिक बांधिलकीतून ही पाणपोई सुरू केली आहे. "यात्रेनिमित्त येणाऱ्या प्रत्येक भाविकाला स्वच्छ आणि थंड पाणी मिळावे हाच यामागचा उद्देश आहे," असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी सुवणार्ताई झाडे,शशिकांतजी मातंर्डे,प्रशांत काशीद,दत्ता गरड,मेजर लक्ष्मण राठोड,पोपट साठे,भिमा नारायणकर, प्रभाकर नवगेरे, शिवाजी इंगळे, पोपट साठे, अभिषेक नारायणकर, श्रीकांत मातंर्डे, बाणेगावचे उपसरपंच कांबळे, प्रभाकर कोळी, अचुत्य महाराज गिरी, रामहरी शेंडगे महाराज, राम ढगे, रमेश पाटोळे, दत्ता गायकवाड, चंद्रकांत नारायणकर, मोतीलाल नारायणकर, अन्नू मातंर्डे, ॲड अजित पाटील, भगवान कदम, प्रशांत काशीद आदी उपस्थित होते

या कार्यक्रमाला मार्डी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजय खरटमल यांच्या या सेवाभावी उपक्रमाचे परिसरात सर्वत्र स्वागत होत आहे.